लोकमत

मस्ट READ

# टकल्या, भाई, डॅडीसह ५३ वॉंटेड

## आरोपींना पकडण्यासाठी विशेष कोंबिंग ऑपरेशन

लोकमत न्यूज नेटवर्क

**हिंगोली :** विविध प्रकारचे गुन्हे करुन धुडगूस घालणाऱ्या वांटेड, फरार आरोपींना पकडण्यासाठी पोलिस प्रशासनाच्या वतीने वेळोवेळी विशेष मोहीम राबवित येत आहे. त्यानुसार अनेकांना पकडण्यात पोलिसांना यश आले आहे.

जिल्ह्यात दररोज कोणत्या ना कोणत्या पोलिस ठाण्यात एखादा तरी गुन्हा नोंद होत आहे. गुन्हा नोंद झाल्यानंतर आरोपीला ताब्यात घेत न्यायालयासमोर हजर करण्यात येते. मात्र काही प्रकरणातील आरोपी सापडत नसल्याने तपासाची गती मंदावते. तर काही प्रकरणात आरोपी न्यायालयात हजर होत नाहीत. त्यामुळे विविध गुन्ह्यात पाहिजे असलेल्या व फरार आरोपींचा शोध घेण्यासाठी पोलिस प्रशासनाच्या वतीने जिल्ह्यात विशेष कोंबिंग ऑपरेशन राबविले जात आहे.




### २०२४ नोव्हेंबरअखेर आकडे सांगतात?

| आरोपी | एकूण | पकडले | शिल्लक |
|---|---|---|---|
| फरार | १२३ | ४१ | ८२ |
| वांटेड | ९६ | ४३ | ५३ |

## १३५ आरोपी रडारवर

जिल्ह्यात पाहिजे असलेले व फरार आरोपींचा शोध घेतला जातो. २०२४ मध्ये नोव्हेंबरअखेर फरार ८२ तर पाहिजे असलेले ५३ आरोपी पोलिसांच्या रडारवर होते.

## ८४ जणांना पोलिसांच्या बेड्या

जिल्ह्यात २०२४ मध्ये वर्षभरात नोव्हेंबरअखेर फरार ४१ व पाहिजे असलेल्या ४३ आरोपींना पोलिसांनी पकडले आहे.



## आरोपींची कुंडली एका क्लीकवर

गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलिस पथकाकडून आरोपींचा शोध घेतला जातो. त्यानंतर आरोपींच्या हाताचे, डोळ्याचे ठसे आदी माहिती ऑनलाईन घेतली जाते. आरोपी कितीही चालक असला तरी पोलिसांच्या तावडीतून सुटू शकत नाही. वेशभूषा व ठिकाण बदलून गुंगारा देणाऱ्या काही आरोपींनाही पोलिसांनी पकडले आहे.